महाराष्ट्र राज्यातील, माजी सैनिकांच्या समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र : समिती- २०१९/प्र.क्र.१९४/१९/२८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :-१८ जुलै, २०१९.

वाचा:- १) मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण) यांचे दि.४/६/२०१९ चे पत्र

प्रस्तावना :-

भारताच्या संरक्षण दलातून दरवर्षी निवृत्त होणाऱ्या अंदाजे ६० हजार सैनिकांपैकी अंदाजे ६ हजार सैनिक हे महाराष्ट्राचे असतात. निवृत्तीनंतर नागरी जीवन जगत असताना या माजी सैनिक/त्यांच्या विधवा/युध्दविधवा/अवलंबित यांना विविध अडचणींना/ समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे ही एक महत्वपूर्ण व अत्यावश्यक बाब आहे. त्याअनुषंगाने राज्यातील माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना /मार्गदर्शन सुचविण्यासाठी शासन प्रतिनिधी/माजी सैनिक प्रतिनिधी/स्वयंसेवा संस्था प्रतिनिधी यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्याबाबत काही माजी सैनिकांनी /विविध माजी सैनिक संघटनांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने तसेच माजी सैनिकांना येणाऱ्या विविध समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी या आदेशाद्वारे मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे अभ्यास समिती गठीत करण्यात येत आहे.

१.	मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण)	अध्यक्ष
२.	मा.राज्यमंत्री (माजी सैनिक कल्याण)	उपाध्यक्ष
३.	प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी (१)	सदस्य
४.	अपर मुख्य सचिव (वित्त)	सदस्य
५.	अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)	सदस्य
६.	अपर मुख्य सचिव (उद्योग)	सदस्य
७.	अपर मुख्य सचिव (महसूल)	सदस्य
८.	प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सदस्य
९.	प्रधान सचिव (कौशल्य विकास व उद्योजकता विभाग	सदस्य
१०.	प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग)	सदस्य
११.	प्रधान सचिव (नगर विकास विभाग)	सदस्य
१२.	संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे	सदस्य
१३	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को) पुणे	सदस्य सचिव
१४.	प्रादेशिक विभाग, कोकण (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य
१५.	प्रादेशिक विभाग, पुणे (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य
१६.	प्रादेशिक विभाग, नाशिक (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य
१७.	प्रादेशिक विभाग, औरंगाबाद (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य
१८.	प्रादेशिक विभाग, अमरावती (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य
१९.	प्रादेशिक विभाग, नागपूर (प्रत्येकी २ माजी सैनिक)	अशासकीय सदस्य

२. अभ्यास समितीच्या कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

अ) राज्यातील माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

ब) माजी सैनिकांनी शासनाने केलेल्या अर्जाबाबत सरकारी यंत्रणेच्या सहाय्याने चौकशी करणे.

क) माजी सैनिकांकडून आलेले अर्ज तपासून प्रकरणपरत्वे त्या अर्जासंबंधी शासन स्तरावर तातडीने निकाली काढणे.

३. सदर समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

४. सदरच्या समितीतील माजी सैनिक सदस्यांची नियुक्ती (प्रत्येक विभागातून-२ या प्रमाणे) मा.अध्यक्ष तथा मा.मंत्री (माजी सैनिक कल्याण) व सदस्य सचिव यांच्या मान्यतेने ठरविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०७३०११५२१८७१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2019.07.30 12:01:39 +05'30'

(सु.म.खाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
४) सर्व मा.विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
५) मा.मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव ,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व जिल्हाधिकारी,
९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१०)* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई,
११) * प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१२) * आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१३) * सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई
१४) * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१५) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
१६) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१७) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई
१८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को), पुणे.
२०) संचालक, सैनिक कल्याण विभाग, -रायगड॰ राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, घोरपडी, पुणे,
२१) उप सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई,
२२) प्रादेशिक विभाग, कोकण /पुणे/ नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२३) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख आणि कार्यालय प्रमुख
२४) सर्व मंत्रालयीन विभाग,
२५) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
२६) निवडनस्ती / कार्यासन-२८